सरकारतर्फे साक्षीदार क्र.४ चा सरतपासः–

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नावः | – | अमोल पावलस ठुबे, |
| वय | – | ४० वर्षे, व्यवसाय – व्यवसाय, |
| राहणार | – | खुपटी, ता.नेवासा, जि.अ.नगर. |

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी. औताडे यांचे मार्फत सुरुः–

१. फिर्यादी चंदा ही माझी मेहुणी आहे. मी आरोपींना ओळखतो कारण आरोपी फिर्यादीच्या शेजारी राहतात.घटना दि. ११/११/२०२० रोजी दुपारी ०४.०० वाजता लाखेफळ येथे बापू शेंडे यांच्या घरी घडली होती. त्यावेळी मी माझे घरी खुपटी येथे होतो. त्यावेळी मला फिर्यादीचा फोन आला. तिने मला फोनवर सांगितले की, आरोपी क्र. २ ची आई ही फिर्यादीच्या घरी गप्पा मारत बसलेली होती म्हणुन आरोपी क्र. १ व २ यांनी तिला लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडयाने मारहाण केली आहे. आरोपी क्र. १ हिने लाथाबुक्क्यांनी व आरोपी क्र. २ याने लाकडी दांडयाने मारहाण केली असल्याचे फिर्यादीने मला सांगितले होते. त्यानंतर फिर्यादीने नेवासाला येऊन फिर्याद दिली असल्याचे मला फोनवर सांगितले. सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. आर. नजन यांचेमार्फत सुरु-

२. हे म्हणणे खरे आहे की, मी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही त्यामुळे मला घटनेबाबत सांगता येणार नाही.हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या सांगण्यावरून मी कोर्टात आलो व जबाब देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना भेटलो नाही व पोलीसांनीही माझा जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मारहाण झाली नाही तरीही मी मारहाण झाली असे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक- १७/०२/२०२६.